## || मानस पूजा ||

(आवाहन)

गजानना या करी आवाहन आसनस्थ व्हावे ।
शुध्दोदक हे पाद्य अर्घ्य अन आचमना घ्यावे ।
दुध दही घृत मध शर्करा पंचामृत स्नान ।
अथर्वशिर्षे रूद्र सुक्त सह श्री सुक्ते स्नान ॥
जरतारीची शाल अर्पिली यज्ञोपवीतहि तसे ।
सर्वांगाला परिमल भाळी तिलक केशरी असे ।
फुले सुगंधी हिरव्या नाजुक दूर्वा एकवीस ।
धुप निरांजन चुन भाकरी ते नैवेद्यास ॥
कर्पुरार्ती मंत्रपुष्प घ्या प्रदक्षिणा नमन ।
चिलिम दिधली सेवा करितो अनन्य मी शरण ।
मंत्र कर्म वा भक्ती न जाणे काल्पनिक पूजा ।
सदभावाने केली उध्दरि निःस्सिम भक्त तुझा ।।
गण गण गणात बोते भजनी दंग सदा तुम्ही ।
सिध्द मंत्र हा जपुनी सर्वदा पावन हो आम्ही ।
एक मागणे शिरी असावा वरद हस्त तुझा ।
गजानना ही आस पुरवी घ्या नमस्कार माझा ।।
मानस पूजा श्लोक त्रिकाली एकविस आवर्तने ।
उच्चारुनी संकल्प आपुला करी जो श्रध्देने ।
मिटतील चिंता हरतिल व्याधि टळतिल आपत्ती ।
गजनानाच्या कृपा प्रसादे सहज मोक्ष प्राप्ती ॥

॥ श्री गजानन महाराज की जय ॥